# ॥ श्रीगुरुचरित्र आशय ॥

## अध्याय तिसरा　　　　　　　　　अंबरीष - व्रतनिरूपण

| विषय :   संभवामि युगे युगे |
|---|
| **विचारधन :-** दुर्वास मुनींच्या शापातून मुक्तता अंबरीष ऋषीची करण्यासाठी, श्रीविष्णुनी दश अवतार  घेतले. ह्या गोष्टीद्वारे पृथ्वीवरील पापाचे ओझे कमी करण्यासाठी, सज्जनांचे रक्षण करण्यासाठी, परमेश्वर अवतार  घेतो हा श्रीगुरुचरित्रकारांचा(श्री. सरस्वती गंगाधर साखरे) दृढ विश्वास श्रीगुरुचरित्रात दिसून येतो. अशाच प्रकारे भक्तवत्सल ‘ब्रह्मा, विष्णु, महेश’ ही त्रिमुर्तिंनी भूतलावर घेतलेले गुरु रुपातील अवतार श्रीगुरुचरित्रात केलेले कथन  आहे. |
| **मीमांसा:-**   श्रीमद् भगवद्गीतेतील अध्याय ४था, श्लोक क्रमांक ८ मध्ये भगवान श्रीकृष्ण सांगतात,<br><br>**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**<br>**धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥ ४-८॥** |

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

## अध्याय तिसरा — अंबरीष - व्रतनिरूपण

**अर्थ:-** सज्जनांच्या रक्षणासाठी, पापीजनांच्या नाशासाठी आणि धर्माची प्रस्थापना करण्यासाठी; मी युगा युगात प्रकट होतो.

हेच तत्व श्रीगुरुचरित्रकारांनी अंबरिष ऋषी - दुर्वास मुनि ह्या पुराण कथेतून सांगितले आहे.

अंबरिष-व्रतनिरुपण ह्या कथेतील दुर्वास मुनी हे अंबरीष ऋषीचे गुरु नसून अभ्यागत म्हणजे अतिथी आहेत.

दुर्वास मुनी हा पाहुणा, अंबरिष ऋषीच्या व्रताचा भंग करण्याच्या वाईट हेतूने आलेला आहे. अशा ह्या त्रासदायक पाहुण्याचे शाप श्रीविष्णु स्वतः पृथ्वीवर दहा अवतार घेऊन भोगतो व आपल्या भक्ताचे रक्षण करतो.

अध्याय दुसरामध्ये श्रीगुरुचरित्रकार सांगतात,’गुरु कोपला तर परमेश्वर त्या गुरुच्या शिष्याचे रक्षण करु शकत नाही.’ अतिथीनिर्मित संकटातून परमेश्वर आपल्या भक्ताचे रक्षण करतो, हे

ह्या कथेतून सांगितले आहे.

**विचारधन :-** ओवी क्रमांक १ ते १३

नामकरणीच्या मनातील शंका शाब्दिक युद्धाद्वारे दूर झाल्यावर, तो सिद्धमुनीचे शिष्यत्व पत्करतो. सिद्धमुनी श्रीगुरुमहात्म्य सांगणारे पुस्तक शिष्यास दाखवितो. तसेच ह्या श्रीगुरुचरित्र पारायणाचे फायदे कथन करतो.

**मीमांसा:-** नामकरणी व सिद्धमुनी यांच्या शाब्दिक चर्चेतून नामकरणीच्या शंकांचे समाधान झाल्यावरच तो (नामकरणी) सिद्धमुनींचे शिष्यत्व पत्करतो. ४५० वर्षेपूर्वी हा प्रासादिक ग्रंथ- श्रीगुरुचरित्र पुस्तकरुपात उपलब्ध होता.

**विचारधन :-** ओवी क्रमांक १९ ते २१

भीमा व अमरजा संगमावर, ‘जसा ज्ञानपंथी रथात बसून

लढणारा वीर आहे’ असा भाव असणारा, कल्पवृक्ष अश्वत्थ (पिंपळ वृक्ष) होता. तेथे बसून (तो- सिद्धमुनी ) ज्ञानाचा उत्कर्ष सांगू लागला.

“गुरुमूर्ती ओळखण्यासाठी आपले वर्तन कसे असावे? ते ऐक. मनात दृढ भक्ति धरुन मग श्रीगुरु ओळखावा.”

**मीमांसा:-**

पिंपळ वृक्षाचा डौलदारपणा शब्दप्रभू ग्रंथकारांनी यथार्थ शब्दात व्यक्त करताना, ही घटना घडलेले ठिकाणही निसर्ग वर्णानासकट उभे केलेले आहे.

**विचारधन :-** ओवी क्रमांक २७ , ३३, ३४

सिद्धमुनि सांगतात,

“ज्यांची श्रीगुरुवर दृढभक्ति नाही , ते सदा दारिद्र्यात राहून कष्ट

करतात. मनातील इच्छा फलद्रुप न झाल्याने अज्ञानरुपी मायेने ते गुरफटले जातात व गुरुला बोल लावतात (दोष देतात ).

दृढ भक्ति सखोल भूमीसारखी असते, दांभिकता उंचवट्याप्रमाणे समजावी. याच कारणाने मन, वाचा व कर्माने निश्चय करुन श्रीगुरुकडे यावे.

जग हेच परब्रह्म आहे, त्याला हात मस्तकापाशी जोडून नमस्कार करावा."

**मीमांसा:-**

स्वतःच्या अपयशाचे खापर, दुसऱ्यावर- गुरुवर टाकण्यारा मनुष्य स्वभाव येथे सांगितलेला दिसतो.

गुरु करताना तन- मन- कर्म सर्वस्वी अर्पून दृढभक्तीने गुरु करावा. त्यात दांभिकता नसावी अन्यथा दांभिकता ही उंचवट्याप्रमाणे सांगितलेली आहे. उंचवट्यावर पाणी स्थिर रहात नाही, वाहून

जाते तसेच दांभिकतेने मनातील भक्ती वाहून जाते.

**विचारधन :-** ओवी क्रमांक ३५ , ते ४०

सिद्धमुनी सांगतात,” इच्छा पुरविणारी कामधेनु श्रीगुरुच आहे.” शिष्याला श्रीगुरु त्रैमूर्तिंचे चरित्र स्वतःच्या कानांनी ऐकावयाचे आहे. “ते मनुष्ययोनीत का अवतरले ? सर्व विस्तारानी सांगावे “, अशी शिष्य विनंति करतो.

**विचारधन :-** ओवी क्रमांक ४१, ४२ , ४३

मग ते योगीश्रेष्ठ काय बोलले ? (ते म्हणाले) “अरे, शिष्या रे, तूच माझे एक औषध आहेस. तूच माझा बोध समुद्र आहेस. तू माझे मन कसे उत्साहित केलेस !” तुला महासुख मिळाले.तुझी

## अध्याय तिसरा     अंबरीष - व्रतनिरूपण

गुरुसेवा फळली. तुला परब्रह्माचा अनुभव मिळाला. तुझ्याशी आता लढाई (शाब्दिक युद्ध) करायला पाहिजे. मी सर्व पृथ्वी हिंडून आलो. कोणालाही अशी बुध्दी झाली नाही . गुरुचरित्र कोणी विचारले नाही. आज आम्ही तुझ्यात ती (बुध्दी )पाहिली.

**मीमांसा:-**

चांगला शिष्य गुरुला समाधान देतो.

इतिहासात आर्य चाणक्य ह्या महान गुरुला चंद्रगुप्त मौर्य हा एकमेव शिष्योत्तम लाभला. आर्य चाणक्यांनाही दुसरा चंद्रगुप्त बनविता आलेला नाही. ठरवून कोणत्याही व्यक्तिला शिष्योत्तम बनविता येत नाही. मुळात त्याच्यात उत्तम शिष्यत्वाचे गुण असावे लागतात.

**विचारधन :-** ओवी क्रमांक ४७ , ४८, ४९

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

## अध्याय तिसरा                                   अंबरीष - व्रतनिरूपण

सिद्धमुनी सांगतात,

"गुरुचरित्र हे कामधेनु आहे. ते वेदशास्त्रसंमत आहे, हे जाणावे. कलियुगात मनुष्यरुप धारण करुन त्रिमूर्ती, आपण अवतार घेतला. भूमीचा भार कमी करण्यासाठी, भक्तजनाचे रक्षण करण्यासाठी, कार्यकारणसंबधातून हरिहर अवतार घेतला.

सिद्धमुनीचे बोलणे ऐकून शिष्यराणाने प्रश्न विचारला,"कोणत्या कारणास्तव मनुष्यदेह धारण करुन, त्रिमूर्तिंनी पृथ्वीवर अवतार घेतला ? "

**मीमांसा:-**

ब्रह्मा, विष्णु आणि महेश ह्या तिघांनी मनुष्यरुपात अवतार घेतले हे प्रतिपादन करण्यासाठी श्रीविष्णुच्या 'दश अवतार कथा' माध्यमातून सांगितले आहे.

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

## अध्याय तिसरा — अंबरीष - व्रतनिरूपण

| |
|---|
| **विचारधन :-** ओवी क्रमांक ५१ ते ५४<br><br>रजोगुणी ब्रह्मदेव- सृष्टी निर्माता असून, सत्त्व गुणी श्रीविष्णु -विश्वाचे पोषण करणारा तर रुद्र श्रीशंकर -विश्वाचा संहार करणारा आहे. निर्माता, पोषक व संहारक हे तिघेही एकमेकांपासून वेगळे नाहीत. पृथ्वीवरील पापाचे ओझे दूर करण्याच्या कारणासाठी त्यांचा भूमीवर मनुष्य अवतार होतो. |
| **मीमांसा:-**<br><br>उत्पत्ती, लय व गति ह्या सृष्टीच्या तीनही स्थितीचा निर्माता परमात्मा एकच आहे. ह्या परमात्म्याची ब्रह्मा, विष्णु, महेश ही तीन रुपे आहेत.<br><br>सृष्टी संहार करण्याचे काम रुद्रांमधील श्रेष्ठ श्रीशंकर करतो.<br><br>हे श्रीमद् भगवद् गीतेत श्रीकृष्णाने अध्याय १०वा श्लोक क्रमांक २३ मध्ये सांगितलेले आहे.<br><br>रुद्र हा एक समूहवाचक शब्द आहे रुद्रांपैकी सर्वांत श्रेष्ठ शंकर. |

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

## अध्याय तिसरा 						अंबरीष - व्रतनिरूपण

रुद्राणाम् शंकरः च अस्मि वित्त-ईशः यक्षरक्षसाम् ।
वसूनाम् पावकः च अस्मि मेरुः शिखरिणाम् अहम् ॥ १० - २३ ॥ - श्रीमद् भगवद् गीता

**अर्थ:**

( अकरा ) रुद्रांमध्ये शंकर , यक्ष राक्षसांमध्ये कुबेर , ( आठ ) वसूंमध्ये अग्नी आणि पर्वतांमध्ये मेरू मीच आहे .

**विचारधन :-** ओवी क्रमांक ५५ ते ७७

परमेश्वर पृथ्वीवर मनुष्यरुपात कारणनिमित्त अवतार घेतो. हे कारण सांगणारी, महाभागवतातील अंबरिषऋषी - व्रत निरुपण कथा येथे सांगितलेली आहे.

**मीमांसा:-** अंबरिष ऋषी ह्या विष्णुभक्त क्षत्रिय राजाचे द्वादशी व्रत भंग करण्यासाठी मुद्दाम दुर्वास मुनी येतात. सूर्योदयापूर्वी १ घटका -चौवीस मिनिटे शिल्लक असताना, नदीवर अनुष्ठान करण्यात वेळ घालवितात. व्रत पूर्ण करण्यासाठी, अंबरिष ऋषी तीर्थ घेऊन

## अध्याय तिसरा अंबरीष - व्रतनिरूपण

व्रताचा उपवास सोडतो. आपण नदीवरुन परत येण्याआधी अंबरिष ऋषीने जेवण केले ,असा गैरसमज दुर्वास मुनी ह्या अतिथीचा होतो. त्यामुळे दुर्वास मुनी अंबरिष ऋषी ह्या विष्णु भक्तास सर्व योनींमध्ये जन्म होईल, हा शाप देतो.

आपल्या भक्तावरचा - अंबरिष ऋषीला दुर्वास मुनींनी दिलेला शाप श्रीविष्णु स्वतः स्विकारतो. ह्या शापामुळे श्रीविष्णुला पृथ्वीवर दहा अवतार घ्यावे लागतात.

ह्या श्रीविष्णुच्या दहा अवतार व त्यांचे प्रयोजन पुढीलप्रमाणे :

- १) मत्स्यः - प्रलयसमये नारायणः हयग्रीवम् हत्वा जीविनः अपालयत्।

सृष्टीच्या प्रलयसमयी, विष्णुनारायणाने हयग्रीवाचा वध करुन, मत्स्य अवतार धारण करुन, सर्व प्राणीमात्रांचे संरक्षण केले होते.

- २) कूर्मः - कूर्मावतारे विष्णुः समुद्रमन्थने देवान् उपाकरोत्।

॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

## अध्याय तिसरा | अंबरीष - व्रतनिरूपण

समुद्रमंथनाच्या वेळी, विष्णुने कासव अवतार धारण करुन, देवांवर कृपा केली होती.

- ३) वराहः - हरिः वराहरूपेण आविर्भूय हिरण्याक्षं हत्वा भुवम् अरक्षत्।

हरीने वराह अवतार धारण करुन, हिरण्याक्ष राक्षसाचा वध करुन, पृथ्वीचे रक्षण केले होते.

- ४) नृसिंहः - नारायणः असुरं हिरण्यकशिपुम् अमारयत् ।

विष्णुनारायणाने नरसिंह अवतार धारण करुन, हिरण्यकशिपु राक्षसाला ठार मारले होते.

- ५) वामनः - दानशूरस्य बलेः गर्वहरणं कृत्वा तम् अमारयत्।

विष्णुनारायणाने वामन अवतार धारण करुन, दानशूर बलीराजाचे गर्वहरण करुन, त्याला ठार मारले होते.

- ६)परशुरामः - २१ पृथिवीप्रदक्षिणा कृत्वा १०८ तीर्थक्षेत्राणां संशोधितः।

## अध्याय तिसरा अंबरीष - व्रतनिरूपण

विष्णुनारायणाने परशुराम अवतार धारण करुन, पृथ्वीला २१ वेळा प्रदक्षिणा करुन, १०८ तीर्थक्षेत्रांचे संशोधन केले होते.

- ७) राम: - रावणम् अमारयत् । युगे एकमेव पुरुषोत्तम:।

विष्णुनारायणाने युगातील एकमेव (मर्यादा) पुरुषोत्तमाचा राम अवतार धारण करुन, रावण नामक राक्षसाचा वध केला होता.

- ८) कृष्ण: - कंसं बाल्ये एव अमारयत्। महाभारतयुद्धे सहभाग: गीतोपदेशकर्ता च।

विष्णुनारायणाने कृष्ण अवतार धारण करुन, बाल्य अवस्थेत, कंस राक्षसाचा वध केला होता आणि नंतर महाभारत युद्धात अर्जुनाला गीतामृताचा उपदेश केला होता.

- ९) बौद्ध: - कलियुगे सिद्धपुरुष: जनहितकर्ता च ।

विष्णुनारायणाने बौद्ध अवतार धारण करुन, कलियुगातील लोककल्याण करणारा, एक सिद्धपुरुष असा लौकिक प्राप्त केला होता.

- १०) कलकी - कलियुगे दुष्टानां संहारं कर्तुं आविर्भविष्यति।

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय ॥

### अध्याय तिसरा अंबरीष - व्रतनिरूपण

विष्णुनारायण कलकीचा अवतार धारण करुन कलियुगात दुष्टांचा संहार करण्यास येणार आहेत असे भविष्य वर्तविले जाते.

ह्या दहा अवतारांमधून श्रीविष्णुने सज्जनांचे रक्षण व दुर्जनांचे निर्दालन केलेले दिसते. श्रीविष्णुच्या दश अवतार कथेचा आधार घेऊन पुढील अध्याय - ४ मध्ये श्रीदत्तात्रेय जन्मकथा सांगितलेली दिसते.